रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

बुधवार, एप्रिल ३०, १९९७/वैशाख १०, शके १९१९

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**CO-OPERATION AND TEXTILES DEPARTMENT**

Mantralaya Annexe, Mumbai-400 032, dated the 30th April 1997

**Order**

Sugarcane (Control) Order, 1966.

No. Misc. 1195/CR-286/25-C.—In exercise of the powers conferred by paragraphs (*a*), (*e*) and (*f*) of sub-clause (1) of clause 6 and sub-clause (*a*) of clause 9 of the Sugarcane (Control) Order, 1966 read with the notification of Government of India, Ministry of Food, Agriculture, Community Development and Co-operation (Department of Food), No. GSR. 1127/ESS. Com. Sugarcane, dated the 16th July, 1996; and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following

order further to amend the Maharashtra Sugar Factories (Reservation of Areas and Regulation of Crushing and Sugarcane Supply) Order, 1984, as follows, namely :—

1. This Order may be called the Maharashtra Sugar Factories (Reservation of Areas and Regulation of Crushing and Sugarcane Supply) (Amendment) Order, 1997.

2. In Maharashtra Sugar Factories (Reservation of Areas and Regulation of Crushing and Sugarcane Supply) Order, 1984,—

(*i*) in clause 3, to the condition No. (2), the following provisos shall be added :—

Provided that in case of a Co-operative Sugar Factory, the cane growers who are not member of the Co-operative Society, shall be free to supply their cane to any factory of their choice :

Provided further that a member of a Co-operative sugar factory shall be bound to supply sugarcane to that Co-operative Sugar factory in the ratio of shares held by him and area under sugarcane as per the bye-laws of the Co-operative sugar factory and he will be free to supply excess cane, if any, to any factory of his choice by entering into agreement or contract to that effect :

Provided also that the Non-member cane growers in case of a Co-operative sugar factory and cane growers in case of other sugar factories shall be free to supply their sugarcane to any factory of their choice by entering into agreement or contract to that effect. Same provision will apply to excess sugarcane or the member of Co-operative Sugar factories :

Provided also that if any cane grower fails to enter into such agreement for supply of his sugarcane, responsibility of disposal of such cane shall be entirely his own. There shall be no responsibility on any sugar factory, Co-operative or otherwise or on the State Government, for crushing of any such cane.

(*ii*) in Form ' (B) ' appended to the principal order, in paragraph (3),—

(*1*) In condition No. (*xvi*),—

(*a*) after the words " fails to register cane in its area of operation within the prescribed time limit ", the following words shall be inserted, namely :—

" Such cane growers shall be free to register their cane with any other factory ".

(*b*) the portion beginning with the words " such defaulting factory " and ending with the words " registration of such cane " shall be deleted.





(2) after condition No. (*xvi*), the following condition shall be inserted, namely :—

" (*xvi-a*) Sugar factory shall make all efforts to register the cane in its area of operation within the time prescribed by the Commissioner of Sugar. The cane of non-member can be registered only with their full consent. Similarly excess cane of members shall also be registered with their full consent. The registration forms shall be in duplicate and one copy should be given to the cane-grower. If the cane is shown as registered but duplicate copy is not given to the cane grower, a fine of Rs. One hundred only per farmer will be imposed on such defaulting factory. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. M. PREMKUMAR,
Secretary to Government.

## सहकार व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० एप्रिल १९९७

### आदेश

**शुगरकेन (कंट्रोल) ऑर्डर, १९६६.**

क्रमांक संकीर्ण. ११९५/प्र. क्र. २८६/२५-स.—शुगरकेन (कंट्रोल) ऑर्डर, १९६६ च्या खंड ६ च्या उप-खंड १ मधील परिच्छेद (अे) (ई) व (एफ) आणि खंड ९, उप-खंड (अे) तसेच, भारत सरकारच्या अन्न, कृषि, सामाजिक विकास व सहकार विभागाच्या (अन्न विभाग) अधिसूचना क्रमांक जीएसआर. ११२६/इएसएस-सीओएम/शुगरकेन, दिनांक १६ जुलै १९६६ अन्वये प्राप्त व यांसंबंधी असलेल्या इतर सर्व अनुषंगिक अधिकारानुसार महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश, १९८४ मध्ये दुरुस्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे, जसे :—

१. या आदेशाला महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) (दुरुस्ती) आदेश, १९९७ असे संबोधण्यात यावेत.

२. महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश, १९८४,—

(१) मूळ आदेशाच्या खंड ३ मधील अट क्र. (२) च्या पुढे खालील परंतुक जोडण्यात यावे :—

जे ऊस उत्पादक शेतकरी कोणत्याही सहकारी साखर कारखान्याचे सभासद नाहीत, त्यांचा ऊस त्यांच्या मर्जीप्रमाणे कोणत्याही साखर कारखान्यांना देण्याची त्यांना मुभा राहील :

कारखान्यांच्या ऊस उत्पादक सभासदांनी कारखान्याच्या पोट नियमांतील तरतुदी-नुसार त्यांनी धारण केलेल्या भागाच्या व उसाखालील क्षेत्राच्या प्रमाणात नोंदणी केलेला ऊस संबंधित साखर कारखान्याला घालणे बंधनकारक राहील, पोट-नियमांतील तरतुदीपेक्षा जास्त ऊस असल्यास तो ऊस दुसऱ्या कोणत्याही कारखान्याला करारनामा करुन देण्याची मुभा ऊस उत्पादक सभासदास राहील :

सहकारी साखर कारखान्यांचे बिगर सभासद ऊस उत्पादक शेतकरी तसेच, साखर कारखान्याचे ऊस उत्पादक शेतकरी त्यांना यांचा ऊस त्यांच्या मर्जीप्रमाणे कोणत्याही साखर कारखान्यांशी करारनामा करून देण्याची मुभा राहील. तसेच, साखर कार-खान्यांच्या ऊस उत्पादक सभासदांपैकी ज्यांचा ऊस अतिरिक्त असेल, त्यांनादेखील त्यांच्या मर्जीप्रमाणे इतर कारखान्यांशी करारनामा करून ऊस देण्याची मभा राहील :

ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांच्या मर्जीप्रमाणे ऊस देण्यासंबंधी कोणत्याही कार-खान्याबरोबर करार केला नसल्यास त्यांच्या ऊसाच्या गाळपाची जबाबदारी शासनाची अगर कारखान्यांची राहणार नाही.





(२) मूळ आदेशासोबत जोडलेल्या फॉर्म "(बो)". मधील परिच्छेद (३), मध्ये—

(१) अट क्रमांक (१६) मध्ये,—

(अ) "दिलेल्या मुदतीत कारखान्याने जर त्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊसाच्या नोंदी केल्या नाहीत", या शब्दानंतर खालील शब्द जोडण्यात यावेत :—

"ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांचा ऊस दुसऱ्या कोणत्याही कारखान्यांकडे नोंद करण्याची मुभा राहील",

(ब) "असा दोषी कारखाना ऊस नोंदीच्या तारखेपर्यंत प्रतीदिन प्रति टन रु. १०० (रुपये शंभर फक्त) दंडास पात्र राहील", हे शब्द वगळण्यात यावेत.

(२) अट क्रमांक (१६) नंतर खालील अट घालण्यात यावी, जसे :—

"(१६-अ) साखर आयुक्तांनी ठरवून दिलेल्या कालावधीत कार्यक्षेत्रातील संपूर्ण ऊसाच्या नोंदी करण्याबाबत कारखाना प्रयत्नशील राहील.

बिगर सभासदाच्या ऊसाची नोंद बिगर सभासदाच्या मर्जीनुसार कारखाना करू शकेल. त्याचप्रमाणे कारखान्याच्या सभासदांच्या अतिरिक्त ऊसाची नोंदसुद्धा कारखाना संबंधित सभासदाच्या मर्जीनुसार करील. ऊसाची नोंद द्विप्रतीत करून त्याची एक प्रत संबंधित ऊस उत्पादकास द्यावी. जर ऊसाची नोंद करून नोंदी-संबंधीचे पत्र संबंधित उस उत्पादकास दिले नसेल तर असा दोषी कारखाना प्रती शेतकरी रु. १०० (रुपये शंभर फक्त) प्रमाणे दंडास पात्र राहील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आर. एम. प्रेमकुमार,
सचिव (सहकार).



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.